सायं.दैनिक
बीड
# किसान
www.beedkisan.in
• संपादक : शेख कामरान • BEED KISAN

बीड ■ वर्ष ५ ■ अंक ३३८ ■ रविवार, दि. १९ एप्रिल, २०२६ ■ पोस्टल दिनांक २० एप्रिल, २०२६ ■ RNI : MAHMAR/2021/80738 ■ Postal No. LSB/Beed/RNP-211/2024-2026 ■ पाने ४ ■ किंमत २ रु.

BEED ■ Year-5 ■ Issue-338 ■ Sunday 19 April, 2026 ■ Postal Date 20 April, 2026 ■ RNI : MAHMAR/2021/80738 ■ Postal No. LSB/Beed/RNP-211/2024-2026 ■ Pages 4 ■ Price 2

## अंबड तालुक्यातील ग्रामस्थांना अचानक लोड शेडींगचा सामना करावा लागणार?

अंबड (किसान न्युज): अंबड तालुक्यात महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित कडून अचानक लागू करण्यात आलेल्या इमर्जन्सी लोडशेडिंगमुळे जालना जिल्हासह अंबड तालुका व परिसरात मोठ्या प्रमाणात वीजपुरवठा खंडित झाला आहे. कोणतेही ठराविक वेळापत्रक नसल्याने नागरिकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. महावितरणकडून देण्यात आलेल्या माहितीनुसार, सध्या सुरू असलेले भारनियमन हे पूर्णपणे तातडीच्या परिस्थितीमुळे करण्यात येत असून, मुख्य कार्यालयाकडून कधीही फोन किंवा संदेशाद्वारे वीज बंद करण्याचे निर्देश मिळत आहेत. त्यामुळे वीज कधी जाईल याचा निश्चित अंदाज देता येत नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. अंबड तालुका व ग्रामीण भागात सतत वीजपुरवठ्यात अडथळे येत असून नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करून उकाड्याच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना उष्णतेचा त्रासही सहन करावा लागत आहे.

# लोकांनी तलावात पाण्याच्या मोटारी टाकल्या, एवढ्या मोटारी टाकल्यावर समुद्राचे पण पाणी पुरणार नाही



## कलेक्टरांनी पिण्यासाठी पाणी आरक्षित ठेवण्याचे आदेश देऊन ही उपसा सुरूच

बीड । किसान न्युज

यावर्षी पावसाळा कमी असल्याचे भाकीत हवामान विभागाने व्यक्त केले आहे. यामुळे जिल्ह्यावर दुष्काळाचे सावट दिसून येत आहे. कडक उन्हाळा सुरू असल्याने पाण्याचे बाष्पीभवन होऊन जलप्रकल्पातील पाणीसाठा झपाट्याने कमी होत असून, अनेक तलाव मृतसाठ्यात गेले आहेत. यामुळे पाणीटंचाई निर्माण होऊ नये म्हणून जिल्हाधिकारी यांनी पाणी उपसा बंद करण्याचे आदेश दिले आहेत. पण पाटोदा तालुक्यातील भायाळा तलावातून अवैध पाणी उपसा सुरू आहे. याकडे भरारीपथकाचे दुर्लक्ष दिसून येत आहे. यामुळे पाणीटंचाईचे संकट गडद दिसून येत आहे. याकडे जिल्हाधिकारी यांनी लक्ष द्यावे अशी मागणी करण्यात येत आहे. ऐका पुढील हाका पिण्यासाठी पाणी आरक्षित ठेवा अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### संबंधित यंत्रणेने लक्ष देण्याची जनतेची मागणी



अल निनो चा प्रभाव असल्याने यावर्षी पाऊस घटनार असल्याचे भाकीत व्यक्त केले आहेत. पुढील धोका ओळखून पाणी काटकसरीने वापरण्याची गरज आहे. त्यात कडक उन्हामुळे बाष्पीभवन होऊन पाणीसाठा झपाट्याने कमी होत आहे. सध्या जिल्ह्यातील १६ मध्यम प्रकल्पांपैकी ३ प्रकल्पांमध्ये २५ टक्क्यांपेक्षा कमी पाणी शिल्लक आहे. तसेच १२६ लघु प्रकल्पांपैकी १२ प्रकल्प जोत्याखाली गेले असून २१ प्रकल्पांमध्ये ५० टक्केच पाणी आहे. शासनाच्या अहवालानुसार, जिल्ह्यातील एकूण १४३ धरणांमध्ये सध्या १९८.७१२ दशलक्ष घनमीटर पाणी मृतसाठ्यात आहे, तर ३० धरणांमध्ये १० टक्क्यांपेक्षा कमी पाणीसाठा शिल्लक आहे. शासनाच्या नियमानुसार तलावातील ६७ टक्के पाणीच सिंचनासाठी वापरण्याची परवानगी असून उर्वरित ३३ टक्के पाणी मानव, जनावरे व वन्यजीवांसाठी राखीव ठेवणे बंधनकारक आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी पिण्याच्या पाण्याचे नियोजन कोलमडू नये यासाठी जिल्ह्यातील लघु व मध्यम प्रकल्पांमधून होणारा नियमबाह्य पाणी उपसा तत्काळ थांबवण्याचे आदेश महसूल व पाटबंधारे विभागाला दिले होते. मात्र, या आदेशांची अंमलबजावणी होत नसल्याने प्रशासनाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. दरम्यान, भायाळा तलावातून पाणी उपसा होत असल्याने » पान २ वर

### दुष्काळाची शक्यता

बीड जिल्हा दुष्काळग्रस्त म्हणून ओळखला जातो. यावर्षी 'अल निनो' च्या प्रभावामुळे परिस्थिती अधिक गंभीर होण्याची चिन्हे आहेत. त्यामुळे तातडीने उपाययोजना न केल्यास ग्रामीण भागात तीव्र पाणीटंचाई निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यामुळे प्रशासनाने लक्ष द्यावे आणि हा धोका ओळखावा अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### अल निनोचे सावट अन् तलावातून अवैध पाणी उपसा; जिल्ह्यात पाणीबाणी निर्माण होण्याची शक्यता

### कागदी घोडे नाचवण्यात प्रशासन मग्न – डॉ. ढवळे

अवैध पाणी उपसा रोखण्यासाठी नेमण्यात आलेले पथक निष्क्रिय असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी केला आहे. प्रशासन केवळ कागदोपत्री कारवाई करत असून प्रत्यक्षात कोणतीही ठोस उपाययोजना होत नसल्याची टीका त्यांनी केली आहे.


---

पाडळसिंगी टोलनाक्यावर फक्त वसुलीच

# सुविधांच्या आईचा घो...

## स्वच्छता गृहांची दुरावस्था, तुटलेली दार खिडक्या अन् घाणीचे साम्राज्य

बीड । किसान न्युज



तालुक्यातील पाडळसिंगी येथील टोलनाक्यावर फक्त वसुलीच दिसत असून, प्रवाशांच्या सोयीसाठी बांधलेल्या स्वच्छता ग्रहांची दुरवस्था झाली असून, याचे दरवाचे,खिडक्या तुटल्या आहे तर साफसफाई नसल्याने घाणीचे साम्राज्य निर्माण झाले आहे. यामुळे येथे सुविधांच्या आईचा घो अशी परिस्थिती निर्माण झाल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली जात आहे.

सोलापूर–धुळे हा चारपदरी राष्ट्रीय महामार्ग बीड शहरातून जात असून, शहरापासून काही अंतरावर पाडळसिंगी येथे या रस्त्याच्या टोल वसुलीसाठी टोलनाका उभारण्यात आला आहे. येथून दररोज हजारो प्रवासी अन् शेकडो वाहने येजा करतात. येथे टोलनाक्यावर दररोज लाखोंची टोल वसुली केली जाते, येथे अनेक कर्मचारी नियुक्त आहेत. तसेच येथे प्रवाशांच्या सोयीसाठी टोलनाक्याच्या दोन्ही बाजूला स्वच्छता ग्रह बांधलेली आहेत. येथे मुबलक पाणी आणि स्वच्छता ठेवणे आवश्यक असताना मात्र येथे केवळ वसुलीच होत असून सुविधांच्या बाबतीत मात्र सर्व काही आलबेल दिसत आहे. या स्वच्छता ग्राहकांच्या दरवाजाचे हॅन्डल, खिडक्याची » पान २ वर

---

# राष्ट्रीय काँग्रेस पक्ष देणार बीडला जिल्हाध्यक्ष म्हणून मुस्लिम चेहरा

## फरीद देशमुख, अमर शेख यांच्या नावाची जोरदार चर्चा; बीडचा रहिवासी जिल्हाध्यक्ष दिलातर पक्षवाढीला चालना मिळणार

बीड । किसान न्युज



जिल्ह्याला राष्ट्रीय काँग्रेस पक्ष जिल्हाध्यक्ष म्हणून मुस्लिम चेहरा देण्याच्या विचारात असल्याची चर्चा सुरू आहे. या पार्श्वभूमीवर सध्या जिल्हाध्यक्ष पदाच्या शर्यतीत बीड मधून काँग्रेसचे माजी आ. सिराज देशमुख यांचे चिरंजीव फरीद देशमुख आणि माजी नगरसेवक अमर शेख हे दोन मुस्लिम चेहरे चर्चेत आहेत. जर बीड शहरातील जिल्हाध्यक्षपदी निवड झाली तर येथे संपर्क कार्यालय झाले तर पक्षवाढीला चालना मिळेल अशी चर्चा सुरू आहे. यामुळे आता पक्ष काय निर्णय घेणार याकडे लक्ष लागले आहे.

बीड जिल्हा एका काळी राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचा बालेकिल्ला समजला जायचा पण बदलत्या काळानुसार आज जिल्ह्यात पक्षाची ताकद किती आहे हे सर्वांना माहीत आहेच. अशीच परिस्थिती सर्वत्र दिसून येते यामुळे पक्षाने आता लोकांमध्ये घुसून काम करणं सुरू केलं आहे. यासाठी पक्षाचे पदाधिकारी हे लोकांमध्ये जाऊन मत जाणून घेत आहेत. तसेच पक्षांतर्गत बदलाच्या ही हलचाली सुरू आहेत. जिल्ह्याची परिस्थिती पाहून त्या अनुषंगाने जिल्हाध्यक्ष आणि कार्यकारीणी नेमण्याची पक्षाची मानसिकता दिसत आहे. या पार्श्वभूमीवर बीड जिल्ह्याला » पान २ वर

### संपर्क कार्यालयाविना जिल्ह्याचे मुख्य ठिकाण

राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचा जिल्हाध्यक्ष हा आतापर्यंतचा बीडच्या बाहेरील राहिला आहे. यामुळे जिल्ह्याचे मुख्यालय असूनही शहरात संपर्क कार्यालय सुरू झाले नाही. ही अवस्था मागील ३० वर्षांपासून आहे. जिल्ह्यातील कोणतेही धरणे आंदोलन मोर्चे हे जिल्ह्याचे ठिकाण असणाऱ्या बीड शहरातून निघतात मात्र येथे कार्यालयच नसल्याने हे महत्त्वाचे पदाधिकारी पाहुण्यासारखी येतात अन् जातात. यामुळे जर बीड शहरातील जिल्हाध्यक्ष झाला तर शहरात संपर्क कार्यालय होईल आणि जिल्हाभरातून येणारे नागरिक कार्यालयात येतील त्यांची कामे होतील याचा फायदा पक्ष वाढीसाठी होईल अशी चर्चा सुरू आहे.

---

# मोबाईल शॉपी फोडून ३० लाखांचा ऐवज लंपास

## गजबजलेल्या सुभाष रोडवर घटना घडल्याने शहरात खळबळ

बीड । किसान न्युज

साई मोबाईल शॉपीचे शटर तोडून अज्ञात चोरांनी अंदाचे ३० ते ३५ लाखांचे मोबाईल आणि रोख रक्कम असा ऐवज लंपास केल्याची घटना आज रविवारी सकाळी उघडकीस आली. शहरातील गजबजलेला आणि बाजारपेठ असलेल्या भागात धाडसी चोरीची घटना घडल्याने खळबळ उडाली आहे. अज्ञात चोट्यांनी सुभाष रोडवर असलेली साई मोबाईल शॉपीचे शटर फोडून आत घुसले आणि येथील महागडे मोबाईल आणि रोख रक्कम असा एकूण ३० ते ३५ लाखांचा ऐवज चोरुन नेल्याची घटना शनिवारी मध्यरात्री २:३० वाजण्याच्या सुमारास घडली आहे. आज रविवार (दि.१९) ही घटना उघडकीस आली. अक्षयतृतीया हा शुभ मुहूर्त असल्याने अनेकजण नव्या वस्तू खरेदी करतात यामुळे साई मोबाईल शॉपीने अनेक महागडे मोबाईल विक्रीसाठी खरेदी केले होते. हीच संधी साधून चोरट्यांनी हात साफ केल्याची चर्चा सुरू आहे. शहरातील गजबजलेला बाजारपेठत चोरट्यांनी धाडसी चोरी केल्याने शहरात खळबळ उडाली आहे. घटनेची माहिती मिळताच शहर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली तसेच श्वान पथक आणि ठसे तज्ञांना पाचारण करण्यात आले होते. तसेच यापूर्वीही या भागात एक मोबाईल शॉपी फोडल्याची घटना घडली आहे. त्याचा आणखी तपास नसताना ही दुसरी घटना घडल्याने पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाला आहे.

---

## राहुल भालशंकर यांचे निधन

बीड । किसान न्युज



शहरातील राहुल अर्जुन भालशंकर (वय ३५ वर्ष) यांचे काल शनिवारी (दि.१८) रात्री हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांच्या पश्चात आई–वडील, पत्नी, मुलगी, भाऊ असा मोठा परिवार आहे. अवघ्या ३५ वर्षाच्या तरुणाचे अचानक निधन झाल्याने कुटुंबावर दुःखाचे डोंगर कोसळले असून परिसरात हळहळ व्यक्त केली जात. मयताच्या पार्थीवावर शंहेशावली दर्गा परिसरातील स्मशानभूमीत दुपारी १:३० वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले. भालशंकर कुटुंबावर कोसळलेल्या दुःखात दै. किसान परिवार सहभागी आहे.

---

# दिव्यांगांचे मानधन रखडले; जगायचे कसे? दिव्यांग बांधवांचा शासनाला आर्त टाहो!

गेवराई । किसान न्युज



गेल्या काही महिन्यांपासून गेवराई तालुक्यातील हजारो दिव्यांग बांधवांना त्यांचे हक्काचे मानधन अद्याप मिळालेले नाही. दिव्यांग व्यक्तींचे जीवन आणि त्यांचा दैनंदिन खर्च (दवाखाना, औषधोपचार, किराणा व मुलांचे शिक्षण) पूर्णतः या मानधनावर अवलंबून असतो. सद्यस्थितीत मानधनाअभावी दिव्यांग बांधवांची परिस्थिती अत्यंत बिकट झाली आहे. पोर्टलवर कोणतीही माहिती उपलब्ध नसून, संबंधित विभागाकडून समाधानकारक उत्तरे मिळत नाहीत. ही बाब अत्यंत संवेदनशील असून दिव्यांगांच्या मानवी हक्कांचे उल्लंघन करणारी आहे.आमचं मानधन कधी मिळणार? हा एकच प्रश्न आज हजारो दिव्यांग बांधवांच्या ओठावर आहे. गेल्या अनेक दिवसांपासून मानधन थकीत असल्याने दिव्यांगांची अवस्था बिकट झाली असून, शासनाच्या उदासीनतेविरुद्ध आता तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.दिव्यांग बांधवांचे प्रश्न मांडणारे सोशल मीडियावर आणि » पान २ वर

### दिव्यांगांच्या भावनांशी खेळ थांबवा!–शुभम घोडके

दिव्यांगांच्या प्रश्नांवर दिव्यांग बांधवांचे प्रतिनिधित्व करणारे यांनी या प्रश्नी शासनाचे लक्ष वेधले आहे. त्यांनी म्हटले आहे की, हे केवळ आर्थिक साहाय्य नाही, तर हा त्यांच्या जगण्याचा आधार आहे. मानधन वेळेवर न मिळणे ही अत्यंत क्लेशदायक बाब आहे. शासनाने या विषयाचे गांभीर्य ओळखून तात्काळ मानधन वितरीत करावे, अन्यथा दिव्यांग बांधव रस्त्यावर उतरून आपल्या हक्कासाठी लढा देतील, असा इशारा देण्यात आला आहे.

---

# अवैध मावा कारखान्यावर गेवराई पीआय पवारांची धाड

## २ लाख १२हजाराचा मुद्देमाल जप्त; गेवराई पोलीस व अन्न भेसळ अधिकारी यांची संयुक्त कारवाई

गेवराई । किसान न्युज



बीड राज्य सरकारने गुटखा व तंबाखूजन्य पदार्थावर बंदी केली असताना देखील बीड जिल्ह्यात मात्र गुटखा राजरोस विक्री केली जात असल्याचे चित्र दिसत आहे. बीड जिल्ह्यात गुटखा साठवण व विक्री करणारावर पोलिसाकडून कारवाईचा फास आवळला जात असून गुटखा माफीयावर पोलीस ठाण्यात गुन्हे देखील दाखल करण्यात आले आहेत. बीड जिल्ह्यात अवैध गुटखा व मावा विक्रीवर आळा घालण्यासाठी सुरू असलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत गेवराई पोलिसांनी मोठी कारवाई करत शहरातील एका ठिकाणी चालू असलेला मावा तयार करण्याचा कारखाना उध्वस्त केला. » पान २ वर

---

स्थानिक सोने चांदीचे भाव..

पंकज ज्वेलर्स

पिंगळे गल्ली, कारंजा रोड, बीड

9850643058

सोने २४ कॅरेट 153,500

२२ कॅरेट 147,000

चांदी प्रतिकिलो 252,000

---

गेवराई शहराच्या वैभवात भर!

# मुख्य चौकात उभारणार भव्य दिव्य छत्रपती शिवरायांचे स्मारक

गेवराई । किसान न्युज



हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मृतीला अभिवादन म्हणून गेवराई शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी एका अत्यंत भव्य आणि दिव्य अश्वारूढ पुतळ्याचे व स्मारकाचे नियोजन करण्यात आले आहे. या स्मारकामुळे गेवराई शहराच्या सौंदर्यात भर पडणार असून, हे ठिकाण शिवप्रेमींचे प्रमुख आकर्षण केंद्र ठरणार आहे. अशी आहे स्मारकाची संकल्पना: गेवराई शहरातील मुख्य चौकात हे स्मारक उभारले जाणार आहे. गजबजलेल्या मुख्य चौकाचे सुशोभीकरण करून, तेथे महाराजांचा एक देखणा अश्वारूढ पुतळा स्थापित करण्याचे प्रशासनाने आणि स्थानिक शिवप्रेमींनी निश्चित केले आहे. या भव्य स्मारकासाठी सध्या वाहतुकीची कोंडी टाळण्यासाठी योग्य नियोजन करून, मध्यभागी स्मारक उभे केले जाणार आहे. प्रशासनाचा सकारात्मक पुढाकार: सुरुवातीला पुतळा स्थलांतराबाबत काही मतमतांतरे असली, तरी आता प्रशासन, स्थानिक नागरिक आणि सर्व पक्षीय नेते यांनी सकारात्मक भूमिका घेतली आहे. सामाजिक एकता » पान २ वर

---

# बीड येथील कृषी प्रदर्शनाची जय्यत तयारी; विविध समित्यांचे गठण

## स्वागताध्यक्षपदी दिलीप गोरे तर कार्याध्यक्षपदी कृषीभूषण शिवराम घोडके

बीड । किसान न्युज



मराठवाड्यातील शेतकऱ्यांना तंत्रज्ञानाची माहिती मिळावी या उद्देशाने गेल्या १८ वर्षांपासून किसान कृषि विकास प्रतिष्ठानच्या वतीने प्रदर्शनाचे आयोजन केले आहे. दरवर्षी गेवराई येथे सातत्याने होणारे हे प्रदर्शन या वर्षी प्रथमच बीड तालुक्यातील शेतकऱ्यांच्या आग्रहास्तव दुसऱ्यांदा दिनांक ०१ मे ते ०५ मे दरम्यान किसान कृषी महोत्सव या द्वारे छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण ( मल्टीपर्पज ग्राउंड ) या मैदानात भव्य अशा ५ दिवसीय राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचे आयोजन केले आहे. प्रदर्शन जय्यत तयारी सुरू असून या अनुषंगाने विविध समित्यांचे गठन करण्यात आले. गेवराई चे लोकप्रिय आमदार विजयसिंह पंडित यांच्या पुढाकारातून व संपादक दिलीप खिस्ती, संपादक शेख तय्यब, संपादक गंमत भाऊ भंडारी, संपादक संतोष मानूरकर, वसंत मुडे, मनमोहन कलंत्री यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रदर्शनाचे आयोजन केले असून स्वागताध्यक्षपदी दिलीपराव गोरे » पान २ वर

### शेतकऱ्यांना दिला जाणार मोफत स्टॉल

शासनाच्या मदतीविना हे प्रदर्शन होत असून गेल्या १८ वर्षापासून शासनाच्या कोणत्याही अनुदानाशिवाय ही संस्था हे प्रदर्शन सातत्याने आयोजित करते यावेळी प्रथमच जिल्ह्यातील उत्कृष्ट दर्जाचा उत्पादित केलेला धान्य माल थेट ग्राहकांच्या च्या दारात मिळावा या उद्देशाने शेतकऱ्यांना मोफत स्टॉल दिला जाणार आहे तसेच नाविन्यपूर्ण उपक्रम करणाऱ्या संस्थांना अल्प दरात स्टॉल दिला जाणार आहे स्टॉल बुकिंग साठी खालील क्रमांकावर संपर्क साधावा ९८८१०४५३१५,९४२२२९४३३८,८६००४७४६०६